# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 17/02/2023 (शुक्रवार) दुपार

---

### विनयभंग करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. भिवापूर** :— दिनांक ३०/१२/२०२० चे २१.४१ वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. भिवापूर येथे अप. क्र. ३९३/२० कलम ३५४ (अ) (ब) भादवि. सहकलम ८, १०, १२ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ३०/१२/२०२० चे १५.०० वा. दरम्यान यातील फिर्यादीचे पिडीत मुली हे त्यांचे अंगणात खेळत असतांना त्यांचे क्वार्टरचे बाजुला राहणारा आरोपी नामे— नरेशकुमार दयानंद शौकीन वय ५० वर्ष, ह. मु. रेल्वे क्वार्टर भिवापूर यांनी दोघांनाही चॉकलेट देतो म्हणुन घरी बोलाविले. तसेच दरवाजा बंद करून दोन्ही पिडीत मुलींचा विनयभंग केला. नंतर आरोपीने कुणालाही काहीही सांगु नका असे म्हणुन १२३/—रू. फिर्यादीचे पिडीत दोन्ही मुलींना दिले.

सदर प्रकरणाचे तपास तत्कालीन महिला सहायक पोलीस निरीक्षक शितल खोब्रागडे पोस्टे उमरेड यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक १६/०२/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. राठी न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ११, १२ पोक्सो मध्ये व कलम ३५४ (अ) (ब) भादंवि मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास तसेच २०००/—रू. दंड, दंड न भरल्यास ०२ महिने सश्रम कारावास शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री. श्याम खुळे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन सहायक फौजदार ब. नं. ८३१ तुलाराम खडसे पोलीस स्टेशन भिवापूर यांनी मदत केली आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. नरखेड** :— दिनांक १५/०२/२०२३ चे २२:०० वा. ते २३:३० वा. दरम्यान चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादी यांची १६ वर्षीय ०३ महिने सावत्र अल्पवयीन मुलगी ही दि. १५/०२/२०२३ चे रात्री १०.०० वा. चे सुमारास घराबाहेर फिरत होती रात्री ११:३० वाजले तरीही घरी परत आली नसल्याने फिर्यादी व त्याची पत्नीने राहत्या परीसरात व मैत्रीनी तसेच नातेवाईकाकडे मुलीचा शोध घेतला असता तिचे बाबत कोणतीही माहीती मिळुन न आल्याने तिला कोणीतरी अज्ञात ईसमाने तिचा अज्ञान पणाचा फायदा घेवुन पळवुन नेले आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक महेश बोथले मो. नं. ९८९०३७५३९६ हे करीत आहे.

## जनावरांची अवैधरीत्या वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०४ कि. मी. अंतरावरील सीहोरा शिवार दिनांक १६/२/२०२३ चे १३.३० वा. ते १४. ३५ वा. दरम्यान कन्हान पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, नमुद आरोपी क्र. १) गोपाल नथ्थुजी कुंभलकर याच्या शेतात आरोपी क्र. २) जिया कुरेशी एहेसान कुरेशी, रा. कामठी याने कत्तलीकरीता अवैधरित्या गोवंश बांधुन ठेवलेले आहे अशा मिळालेल्या खबरेवरून पोलीस स्टाफ व पंचासमक्ष घटनास्थळी जावुन पाहणी केली असता गोवंश जातीचे ४८ मोठे गोरे व बैल लाल, काळया, पांढऱ्या रंगाचे प्रत्येकी १००००/—रू किंमतीचे एकुण किंमती ४,८०,०००/— रुपयाचा मुद्देमाल पंचनामा कार्यवाही करुन जप्त करण्यात आला गोवंशाचे पालन पोषण करण्याकरिता ज्ञान फाउंडेशन गौशाला बरडगिनी साकोली येथे दाखल करण्यात आले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे फिर्यादी नामे— पोलीस शिपाई अश्विन मधुकर गजभिये वय ३० वर्ष, पोस्टे कन्हान यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ११ (१) (डी) प्राण्यांना निर्दयतेने वागणुक प्रतीबंधक अधिनियम १९६०, कलम ५ (अ), ९, महाराष्ट्र प्राणि सरक्षण (सुधारणा) अ. १९९५ कलम २ महा. प. सं. अ. १९७६ काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सपोनि पोटभरे मो. नं हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**